महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
अ.अ.,मनिसंवसं कक्ष ठाणे.

| | |
|---|---|
| अ.अ. | |
| का.अ.(ना.) | |
| का.अ.(ग्रा.) | |
| व.लि. | |
| शाखा | |
| आवक | |
| दिनांक | |

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी :२५७८४०९, २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.
Mail -mjp.centraloffice.do5@gmail.com

जा.क्र.मजीप्रा-२०१७/विलेश्रेप/(१२५)/आस्था-५ दिनांक:२७/०९/२०१७

## परीपत्रक

**विषय: विभागीय लेखापाल श्रेणी परीक्षा २०१७**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महाराष्ट्र गृह निर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण या महामंडळांच्या कर्मचा-यांकरीता विभागीय लेखापाल परीक्षा २०१७ दिनांक २३.१०.२०१७ ते दिनांक २७.१०.२०१७ या कालावधीत घेण्याचे प्रस्तावित असल्याचे सचिव,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी दिनांक २५ सप्टेंबर २०१७ रोजीच्या पत्रानुसार कळविले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील विभागीय परीक्षा नियमावली नुसार खालील अटी/शर्ती पुर्ण करणारे उमेदवार विभागीय लेखापाल श्रेणी परीक्षेस बसण्यास पात्र ठरतील.

१)वित्त व लेखा संवर्गात कार्यरत असलेल्या सहाय्यक लेखा अधिका-यापैकी ज्यांनी अद्याप उक्त परीक्षा उत्तीर्ण केली नाही असे सहाय्यक लेखा अधिकारी

२)वित्त व लेखा संवर्गात कार्यरत असलेल्या उपलेखापाला पैकी ज्यांनी अद्याप उक्त परीक्षा उत्तीर्ण केली नाही असे उपलेखापाल.

३)वरीष्ठ लिपीक पदी ५ वर्ष सेवा झालेले, पदवीधर वरीष्ठ लिपीक

४)कनिष्ठ लिपीक पदी १० वर्ष सेवा झालेले, पदवीधर कनिष्ठ लिपीक

५) वरील संवर्गातील उक्त परीक्षेतील काही विषयांत सुट मिळालेले उमेदवार उर्वरीत विषयासाठी परीक्षेला बसु शकतात.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील, वित्त व लेखा संवर्गात, सहाय्यक लेखाधिकारी व उपलेखापाल या संवर्गासाठी, **विभागीय लेखापाल श्रेणी परीक्षा विभागीय परीक्षा म्हणुन,** परीक्षा नियमावलीत विहीत केली असुन,ती त्यांना नियमांनुसार सक्तीची आहे व उक्त परीक्षा उत्तीर्ण केल्याशिवाय, ते पुढील पदोन्नतीस पात्र ठरत नाहीत.

सदर परीक्षेबाबत संबधित कर्मचा-यांचे विहीत नमुन्यातील अर्ज, संपूर्णरीत्या भरुन आपल्या अधिका-याच्या स्वाक्षरी सहीत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावेत.त्यामध्ये जातीचा (विशेषतः मागासवर्गीया बाबतचा) उल्लेख स्पष्ट करावा.तसेच जन्मतारखेच्या पडताळणी बाबत आवश्यक ती कागदपत्रे जसे शाळा सोडल्याचा दाखला,पदवी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, इत्यादी प्रमाणित छायांकित प्रती अर्जासोबत सादर कराव्यात.अर्जातील सर्व मुद्यांची माहिती परीपुर्ण भरावी. नजरचुकीने किवा इतर कोणत्याही कारणाने माहिती अपुर्ण राहिल्यास,संबंधित अर्जदाराला परीक्षेस बसण्याची परवानगी देणे शक्य होणार नाही.

**पात्र कर्मचा-यांचे विहीत नमुन्यातील अर्ज मध्यवर्ती कार्यालयास दिनांक २८ सप्टेबंर २०१७ पर्यंत किवा तत्पुर्वी पोहोचतील अशा रीतीने पाठवावेत.विलंबाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेता येणार नाहीत.तसेच जे कर्मचारी अर्ज करुन, परीक्षेस गैरहजर राहतील त्यांचेकडुन परीक्षेसाठी येणारा खर्च वसुल केला जाईल.सोबत परीक्षेकरीता कर्मचा-यांनी करावयाचा विहीत नमुना जोडला आहे.**

परीक्षेचा निकालाबाबत महालेखाकार कार्यालयाकडुन निर्णय घेतला जातो.त्यामुळे परीक्षेच्या गुणाबाबत,फेरतपासणी व पुर्नमुल्यांका बाबतची कोणतेही अभिवेदने स्वीकारली जाणार नाहीत.

विभागीय लेखापाल पदाच्या उपलब्धते नुसार,विभागीय लेखापाल पदी नियुक्ती देतांना संबंधित परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्या जेष्ठतेनुसार व पात्रतेनुसार विचार करण्यात येईल.

विभागीय लेखापाल श्रेणी परीक्षा उत्तीर्ण होणा-या कर्मचा-यांना केवळ परीक्षा उत्तीर्ण केली आहे म्हणुन पदोन्नती,विशेष वेतन व उच्चस्तर पदाची वेतनश्रेणी, याबाबत हक्क राहणार नाहीत.

परीक्षेचे स्थळ, यथावकाश स्वतंत्ररीत्या कळविण्यात येईल. हे परीपत्रक सर्व संबंधित कर्मचा-यांच्या निर्दशनास आणण्यात यावे व तसे मध्यवर्ती कार्यालयास कळविण्यात यावे.

( अशोक मांडे )
मुख्य प्रशासकीय अधिकारी(प्र.)

सोबत:विहीत नमुना

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

१)मा.सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.एक्सप्रेस टॉवर्स,मुंबई.
२)संचालक(वित्त),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.सिडकोभवन नवी मुंबई
३) मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग ठाणे/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद /नागपुर.

आपल्या अधिपत्याखाली तसेच तात्पुरत्या/प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या पात्र कर्मचा-यांचे विषयांकित अर्ज दिनांक २८ ऑक्टोबर २०१७ पर्यंत, मध्यवर्ती कार्यालयास सादर करण्याची व्यवस्था करावी. वर नमुद दर्शविलेल्या संवर्गा व्यतिरीक्त इतर कोणत्याही कर्मचा-याचे अर्ज पाठवु नये. फक्त मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणा-या अशाच कर्मचा-यांचे अर्ज पाठवावेत. अर्ज सादर करणेसाठी कमी कालावधी असल्याने कर्मचा-यांच्या अर्जांच्या प्रती व आपले पत्र टपालाने तसेच mjp.centraloffice.do5@gmail.com या मेलवर विहीत वेळेत पाठविण्यात याव्यात.

५)उप मुख्यलेख्याधिकारी (१/२),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.सिडकोभवन नवी मुंबई .
६)अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मंडळ ठाणे/पनवेल/सांगली/लातुर/नांदेड/औरंगाबाद. /अहमदनगर /नाशिक/अकोला/अमरावती/नागपुर/गु.प.प.ठाणे/यांत्रिकी मंडळ ठाणे/नागपुर/ म.नि.नि.स.स.ठाणे/ भारत निर्माण कक्ष,नवी मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपुर/अमरावती.

आपल्या अधिपत्याखाली तसेच तात्पुरत्या/प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या पात्र कर्मचा-यांचे विषयांकित अर्ज दिनांक २८ ऑक्टोबर २०१७ पर्यंत, मध्यवर्ती कार्यालयास सादर करण्याची व्यवस्था करावी. वर नमुद दर्शविलेल्या संवर्गा व्यतिरीक्त इतर कोणत्याही कर्मचा-याचे अर्ज पाठवु नये. फक्त मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणा-या अशाच कर्मचा-यांचे अर्ज पाठवावेत. अर्ज सादर करणेसाठी कमी कालावधी असल्याने कर्मचा-यांच्या अर्जांच्या प्रती व आपले पत्र टपालाने तसेच mjp.centraloffice.do5@gmail.com या मेलवर विहीत वेळेत पाठविण्यात याव्यात.

७) कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,विभाग/जलव्यवस्थापन विभाग,ठाणे/विरार/पनवेल /माणगांव /रत्नागिरी /ओरस(सिंधुदुर्गनगरी) /विभाग क्र.१ पुणे /विभाग क्र.२ पुणे/सातारा/कराड/सांगली/कोल्हापुर/सोलापुर /औरंगाबाद /जालना/ बीड/लातुर/उस्मानाबाद/नांदेड/परभणी/नाशिक/ जळगांव/अहमदनगर/संगमनेर/अकोला /वाशिम /बुलढाणा/अमरावती/जलव्यवस्थापन विभाग अमरावती/यवतमाळ/नागपुर/जलव्यवस्थापन नागपुर/ गोंदिया/ चंद्रपुर/वर्धा/ यांत्रिकी विभाग ठाणे/ गु.प.प.ठाणे/गु.प.प.औरंगाबाद/गु.प.प.नागपुर.

३/-

आपल्या अधिपत्याखाली तसेच तात्पुरत्या/प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या पात्र कर्मचा-यांचे विषयांकित अर्ज दिनांक २८ ऑक्टोबर २०१७ पर्यंत, मध्यवर्ती कार्यालयास सादर करण्याची व्यवस्था करावी. वर नमुद दर्शविलेल्या संवर्गा व्यतिरीक्त इतर कोणत्याही कर्मचा-याचे अर्ज पाठवु नये. फक्त मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणा-या अशाच कर्मचा-यांचे अर्ज पाठवावेत. अर्ज सादर करणेसाठी कमी कालावधी असल्याने कर्मचा-यांच्या अर्जांच्या प्रती व आपले पत्र टपालाने तसेच mjp.centraloffice.do5@gmail.com या मेलवर विहीत वेळेत पाठविण्यात याव्यात.

८)उपअभियंता,म.नि.स.व स.ठाणे.

सदर परीपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे वेबसाईट वर प्रसिध्द करावे.

९)लेखाधिकारी (रोशा/भनिनि/निवेशा/गटविमा/संकलन/वसुली/कर्जरोखे/निधी/ अंदाजपत्रक )यांना माहितीसाठी.

१०)कार्यालयान आदेश धारीका २०१७

११)नोटीस बोर्ड.